MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Office of
**The Chief Engineer**
**Maharashtra State Load Dispatch Centre**
Thane-Belapur Road, Airoli
Navi Mumbai-400 708 ( INDIA )
*(ISO 9001-2000 certified unit of Mahatransco)*

**Phone –** (022) **(O)** 2760 1931 **(P)** 2760 1762 **Fax- (022)** 2760 1769/2760 2936
E mail – cesldc@mahasldc.in URL-www.mahatransco.in/www.mahasldc.in

---

# कार्यकारी सारांश

महाराष्ट्र विद्युत मियामक आयोगाच्या पारेषण मुक्त प्रवेशाच्या नियमाच्या कलम १८.१ नुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये सप्टेंबर २०१३ पर्यन्त झालेल्या प्रत्यक्ष खर्चावर आणि ऑक्टोबर २०१३ ते मार्च २०१४ पर्यन्त होणा-या खर्चावर आधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (म.रा.भा.प्रे.कें.)सादर करीत आहे. तसेच नियमांमध्ये आलेल्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०१४ -१५ मध्ये लागणा-या एकंदरीत खर्चाची निश्‍चिती करण्याकरीता सुधारीत तात्पुरते अंदाजपत्रक सादर करीत आहे.

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अंदाजपत्रक**

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने लेखा परीक्षणाच्या आधारे एप्रील २०१२ ते मार्च २०१३ पर्यन्त झालेला प्रत्यक्ष खर्च दिलेला आहे. आर्थिक वर्ष २०१३-१४ चा अंदाजित खर्च सप्टेंबर. १३ पर्यन्त झालेला खर्च व उरलेल्या सहा महिन्यांचा खर्च मागील प्रथेवर आधारीत प्रक्षेपित करुन काढला आहे. आर्थिक वर्ष २०१४ - १५ चा अनुमानित खर्च वरील तत्वार केलेला आहे.

क संचालन व सुव्यवस्था वरचा खर्च हा आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे.कर्मचारी खर्च हा मंजूर पदे आणि महागाई भत्ता विचारात घेवून अनुमानित केलेला आहे आणि व्यवस्थापकीय व सामान्य खर्च हा ३.२५ टक्के दराने मा. नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या उत्तरोत्तर वाढत जाणा-या दराने प्रक्षेपित केला आहे. दुरुस्ती व देखभालीचा खर्च हा योजलेल्या कामाचे अपुषंगाने आहे.

ख महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा सुधारीत भांडवली खर्च आर्थिक वर्ष २०१३-१४ करीता रु.२६६३.६५ लाख असून आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता रु. ९५२ लाख आहे.

ग घसारा हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या ( दरपत्रकाच्या अटी व शर्थी ) नियम २००५ आर्थिक वर्ष २०१२-१३,२०१३-१४ आणि २०१४-१५ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये ठरवून दिलेल्या दराप्रमाणे लागू आहे.

घ दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज थकीत कर्ज व भांडवली कामाकरीता घेतलेल्या नवीन कर्जावर प्रक्षेपित केले आहे.

च खेळते भांडवलावरील व्याज हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (दरपत्रकाच्या अटी व शर्थी ) नियम २००५ आर्थिक वर्ष २०१२-१३,२०१३-१४ आणि २०१४-१५ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये नमुना घालून दिलेल्या दराप्रमाणे काढले आहे.

छ महाराष्ट्र राज्य गुंतवणुकीवरील परतावा हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (दरपत्रकाच्या अटी व शर्थी )नियम २००५ आर्थिक वर्ष २०१२-१३,२०१३-१४ आणि २०१४-१५ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये ठरवून दिलेल्या १५.५ टक्के प्रमाणे प्रक्षेपित केला आहे.

झ इतर मिळकत मागील तत्वावर प्रक्षेपित केली आहे.

**अ) महसूल विवरण विविध स्त्रोताद्वारे (आर्थिक वर्ष २०१२-१३ व २०१३-१४)** (रु.लाख)

| तपशील | आर्थिक वर्ष २०१२-१३ | | | आर्थिक वर्ष २०१३-१४ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | प्रत्यक्ष | अंतिम समायोजना करीता फरक | मंजूर | प्रत्यक्ष (सप्टेंबर २०१३ पर्यन्त) | अंदाजित (सप्टेंबर २०१३ - मे २०१४) | एकूण | प्रायोबिक समायोजना करीता फरक |
| | अ | भ | अ-ब | अ | ब | क | ड | |
| | | | | | | | (ब +क) | (अ-ड) |
| एसएलडीसी शुल्क व प्रभार | १४२४.६८ | १४२४.६८ | ० | २५६३.१५ | ११२५.८२ | १४३७.३३ | २५६३.१५ | ० |
| महाराष्ट्र शासनाचे सहाय्य व अनुदान | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| शेडयुलिंग चार्जेस | २५३.४४ | ३०६.०७ | (५२.६३) | ० | १६५.२५ | १६१.०० | ३२६.२५ | (३२६.२५) |
| रिशेडयुलिंग चार्जेस | १७४.३९ | १७५.१७ | (०.७८) | ० | ३७.११ | ३७.०० | ७४.११ | (७४.११) |
| इतर मिळकती व आवक | ३.७० | ७.७० | (४.००) | ० | ४.३९ | ४.५० | ८.८९ | (८.८९) |
| एकूण बेरीज | १८५६.२१ | १९१३.६२ | (५७.४१) | २५६३.१५ | १३३२.५७ | १६३९.८३ | २९७२.४० | (४०९.२५) |

भार प्रेषण केंद्राचे अंदाज पत्रक हे वरील खर्च आणि भांडवली परतावा.

ब) संचालन किंमत अंदाज रु. लाख

| अ. क्र. | तपशील | मागील आर्थिक वर्ष २०१२-१३ | | चालू आर्थिक वर्ष २०१३-१४ | | येणारे वार्षिक वर्ष २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | समायोजन (केस नं.१३३/२०१२) | लेखा परिक्षित | मंजूर (केस नं. १३३/२०१२) | सुधारीत अंदाजपत्रक | अंदाजित |
| १ | कर्मचा-यांवरील खर्च | ९८२.९८ | १०५०.१३ | १३२४.३५ | ११७०.०० | १४६०.२२ |
| २ | सामान्य प्रशासन खर्च | ३४५.१७ | ३६२.९६ | ३७४.४४ | ४४१.७३ | ४५६.१४ |
| ३ | दुरुस्ती व सुव्यवस्था खर्च | १०४.२१ | ६६.३४ | ११०.९७ | १६६.६१ | २१०.०० |
| ४ | वापरातील भांडवलावरील व्याज | ६३.५४ | ६४.९९ | ७९.०२ | ७९.२७ | ९२.०१ |
| ५ | आरएलडीसी शुल्क व प्रसार | ५९६.२१ | ५९६.२१ | ५९६.३५ | ६०२.९३ | ६०२.९३ |
| | **उपबेरीज** | **२०९२.११** | **२१४०.६३** | **२४८५.१३** | **२४६०.५४** | **२८२१.३१** |

**क) भांडवली खर्चाचा अंदाज** **रु. लाख**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घसारा | २२२.४८ | ९९.६५ | ४२५.९८ | ३७०.४१ | ४७४.०३ |
| २ | व्याज खर्च | १४४.०१ | ८०.२७ | २९७.२७ | २७३.७० | ४४१.६९ |
| ३ | भांडवलीवरील परतावा | ८८.०२ | ५०.१४ | २००.०८ | १६२.५९ | २५५.५८ |
| | **उपबेरीज** | **४५१.५१** | **२३०.०७** | **९२३.३३** | **८०६.६९** | **११७१.३०** |
| | **एकूण अंदाज** | **२५४६.६२** | **२३७०.७०** | **३४०८.४६** | **३२६७.२३** | **३९९२.६१** |

त्यामुळे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अनुमानित अंदाजपत्रक आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी रुपये ३९९२.६१ लाख असल्याचे अंदाज आहे.

आर्थिक वर्ष २०१२-१३ चे प्रत्यक्ष व २०१३ - १४ चे अनुमनित खर्चावर आधारीत तात्पुरते समायोजन केल्यानंतर महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा महसूल खालील प्रमाणे राहील.

## आर्थिक वर्ष २०१४-१५ वर्षाच्या अंदाजपत्रकाचा सारांश

| रु. लाख | एकूण |
|---|---|
| संचालन किंमत अंदाज | |
| कर्मचा-यांवरील खर्च | १४६०.२२ |
| सामान्य प्रशासन खर्च | ४५६.१४ |
| दुरुस्ती व सुव्यवस्था खर्च | २१०.०० |
| वापरातील भांडवलावरील व्याज | ९२.०१ |
| प्रादेशिक भा.प्रे.के.चे शुल्क | ६०२.९३ |
| **उपबेरीज** | **२८२१.३१** |
| आर्थिक वर्ष २०१३-१४(तात्पुरते समायोजन) | (४३३.८४) |
| आर्थिक वर्ष २०१२-१३(समायोजन) | (८.८९) |
| क) एकंदरीत संचलन किंमत | २३७८.५७ |
| भांडवली खर्चाचा अंदाज | |
| घसारा | ४७४.०३ |
| व्याज खर्च | ४४१.६९ |
| भांडवलीवरील परतावा | २५५.५८ |
| **उपबेरीज** | **११७१.३०** |
| आर्थिक वर्ष २०१३-१४(तात्पुरते समायोजन) | -११६.६४ |
| आर्थिक वर्ष २०१२-१३(समायोजन) | (२२४.४४) |
| **ख) एकंदरीत भांडवली खर्च** | **८३०.२२** |
| **एकूण अंदाजित खर्च** | **३२०८.७९** |

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राची आर्थिक वर्ष २०१४ - १५ करीता निव्वळ शुल्क व प्रभार वसूली

| अ.क्र. | तपशील | (रु. लाख) |
|---|---|---|
| १ | भार प्रेषण केंद्राचे आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता एकूण अंदाज पत्रक | **३९९२.६१** |
| २ | आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता पुढे आणलेली महसूली तूट/आधिक्य | **(२३३.३३)** |
| ३ | आर्थिक वर्ष २०१३-१४ करीता पुढे आणलेली महसूली तूट/आधिक्य | **(५५०.४८)** |
| ४ | **निव्वळ बेरीज (१+२+३)** | **३२०८.७९** |

आयोगाच्या निर्देशानुसार केस नं. १३३/२०१२ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अंदाजपत्रिय खर्च हा वितरण परवानाधारकांकडून हा त्यांच्या ऑक्टोबर २०१२ ते सप्टेंबर २०१३ च्या योगायोग आणि ना योगायोगाचा महत्तम मागणीच्या सरासरी प्रमाणात घेण्यात येईल. मागणी खालील प्रमाणे प्रस्तावित केली आहे.

# - प्रार्थना -

अर्जदार सविनय प्रार्थना करतो की आयोगाने

क    महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र संचलनाचे आर्थिक वर्ष २०१४-१५, समायोजन आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता आणि वार्षिक कामगिरी पुनरावलोकन २०१३-१४ करीता चे सुधारीत अंदाजपत्रक विचारात घ्यावे व त्यास मान्यता द्यावी.

ख    महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र शुल्क व प्रभार योग्य वाटेल तसे मंजूर करावे.

ग    म.रा.भा.प्रे.केंद्राच्या अंदाजपत्रक दावा आदेश केस क्र. १३३ दि. २२ मार्च २०१३ मध्ये मंजूर केल्याप्रमाणे शेडयुलिंग प्रभार, रिशेडयुलिंग प्रभार, नोंदणी शुल्क, प्रक्रीया शुल्क, आणि विलंब आकार पूर्वीप्रमाणे सुरु ठेवण्यात यावेत.

इतर राज्य भार प्रेषण केंद्रांच्या आकारणी दर लक्षात घेता तो आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी खालील शुल्क मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (रु. मध्ये) | सुधारीत दर (रु.मध्ये ) |
|---|---|---|---|
| १ | नोंदणी शुल्क | रु.१०,०००/- प्रत्येक जोडणीसाठी | रु.२०,०००/- प्रत्येक जोडणीसाठी |
| २ | शेडयुलिंग चार्जेस | रु.१,०००/- प्रत्येक दिवसाला | रु.३,०००/- प्रत्येक दिवसाला |
| ३ | रिशेडयुलिंग चार्जेस | रु.३,०००/- प्रत्येक आवृत्ती | रु.३,०००/- प्रत्येक आवृत्ती |
| ४ | एसटीओए अर्ज शुल्क | रु.३,०००/- प्रत्येक अर्जासाठी | रु.१०,०००/- प्रत्येक अर्जासाठी |

घ)    उर्जा मंत्रालयाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या शिफारशीप्रमाणे शेडयुलिंग प्रभार, रिशेडयुलिंग प्रभार, नोंदणी शुल्क आणि प्रक्रीया शुल्क यांचे महसूली उत्पन्न म.रा.भा.प्रे.केंद्राकडे अधिक्य आणि राखीव निधीच्या स्वरुपात ठेवावे जे अतिरिक्त निधी म्हणून पुढील भांडवली खर्चाकरीता उपयोगात आणता येईल.

सदर प्रकरणाच्या बाबी आणि संदर्भ यांच्या अनुषंगाने योग्य आणि तत्सम आदेश देण्यात यावेत.

सही/-

ठिकाण : ऐरोली नवी मुंबई

दिनांक : १८ जानेवारी २०१४

अशोक के. लाडे

मुख्य अभियंता, (महाराष्ट्र भार प्रेषण केंद्र)